# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping Women in distress situation**

**Police Station** :- **Malegaon**

**Date of Good Work done** :- **06/01/2023**

**Brief of the work done :-**

पो.स्टे. मालेगाव येथे दाखल विनयभंगाच्या गुन्ह्यात दोघांना सहा महिने कारावास ; महिलांविरुद्धच्या गुन्ह्यात आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा व्हावी यासाठी वाशिम पोलीस दल प्रयत्नशील.

पुण्य नगरी

# विनयभंगप्रकरणी दोघांना सहा महिने कारावास

## वाशीम सत्र न्यायालयाचा निकाल

**मालेगाव, दि. १० (प्रतिनिधी)**

येथील अल्पवयीन युवतीचा विनयभंग केल्याचे निष्पन्न झाल्याने वाशीम सत्र न्यायालयाने शहरातील दोघांना सहा महिणे कारावासाची शिक्षा सुनावली. गणेश सुनील अढाव (२०) व अर्जून रामनाथ शिंदे (२०) दोघेही रा.मालेगाव अशी शिक्षा झालेल्या तरुणांची नावे आहेत.

न्यायालयीन सुत्रांकडून प्राप्त माहितीनुसार, युवतीचा विनयभंग केल्याप्रकरणी प्राप्त तक्रारीवरुन पोलिसांनी २०१९ मध्ये गणेश अढाव व अर्जून शिंदे या युवकांविरुध्द गुन्हा दाखल केला होता. यानंतर सदर प्रकरण न्यायप्रविष्ट करण्यात आले. दरम्यान, न्यायालयात दोन्ही युवकांविरुध्द गुन्हा सिध्द झाल्याने न्यायालयाने दोघांना सहा महिणे कारावास व पाच हजार रुपये दंड तसेच दंड अशी शिक्षा सुनावली. या प्रकरणात पैरवी अधिकारी म्हणून केशवर इरतकर यांनी तर सरकार पक्षा तर्फे सहायक सरकारी अभियोक्ता ए.आर. व्यवहारे यांनी काम पाहिले.